ePaper

**मत पेट्यांमध्ये फेरफार करण्यासाठी सरकारला 15 दिवस मिळतील : पृथ्वीराज चव्हाण**



| वर्ष - 9 । अंक -100 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com । बुधवार, दि. 3 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- टी-२० मालिकेसाठी संघ कधी जाहीर
- खापतीनंतर हार्दिक पांड्याची डरकाळी!
- चीन-पाकिस्तानची वळणार बोबडी!
- संचारसाथी ॲपवरून गदारोळ

**भाजप–शिंदेसेना संघर्ष टोकाला** भाजपचा डाव करेक्ट ओळखला, 'भाई' सावध

# शिंदेंचा 'देवाभाऊ पॅटर्न'!

## नगर पंचायत–नगर परिषद निवडणुकांचा निकाल २१ डिसेंबरला

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यातील नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांत यंदा सत्ताधारी महायुतीतील दोन मोठे घटक—भाजप आणि शिंदेसेना—एकमेकांसमोर उभे ठाकले. या निवडणुकांचा निकाल पूर्वनियोजित वेळेपेक्षा उशिरा म्हणजे २१ डिसेंबरला लागणार असल्याने राजकीय उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. राज्यभरात झालेल्या मतदानात अनेक ठिकाणी युती नसल्यामुळे अंतर्गत संघर्ष ठळकपणे दिसून आला. विशेषत: भाजप आणि शिंदेसेना यांच्यातील वाद थेट टोकाला गेला.**



**२०१४ नंतर बदललेलं राजकीय सूत्र**

२०१४ मध्ये भाजप सत्तेवर आल्यानंतर राज्याच्या निवडणूक व्यवस्थापनाचा चेहरामोहरा बदलला. फडणवीस यांच्या काळात 'प्रत्येक निवडणूक म्हणजे संपूर्ण सामर्थ्याची लढाई' हा पॅटर्न राबवला गेला. मोदी–शहा यांच्या नेतृत्वात पक्षानं वर्षाचे ३६५ दिवस राजकीय सक्रियता ठेवत, निवडणूक यंत्रणा अधिक मजबूत केली.

या पद्धतीचा मोठा फायदा भाजपला मिळत गेला आणि राज्यातील नंबर एकचा पक्ष म्हणून भाजप स्वतःला सिद्ध करू शकला. २०१४ ते २०१९ या काळात भाजपचा हा 'पूर्ण शक्तीचा पॅटर्न' प्रत्येक निवडणुकीत दिसून आला.

**शिंदेही उतरले भाजपच्या पॅटर्नवर — ५३ सभा, राज्यभर दौरे**

एकनाथ शिंदे यांचं मुख्यमंत्रीपद गेल्यानंतर, यंदाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्यांनी प्रथमच मोठ्या प्रमाणात स्वतंत्रपणे जोर लावला.

- **शिंदेंची राज्यभर झंझावाती मोहीम भाजपला सरळ भिडणारी**
- **यंदा २०१५ ची चूक शिताफीनं टाळली**
- **नगरपंचायत–नगरपरिषद निकाल २१ डिसेंबरला**
- **भाजप–शिंदेसेना संघर्ष राज्यभर टोकाला**
- **शिंदेंच्या ५३ सभा — भाजपला थेट आव्हान**
- **२०१५ ची चूक टाळून यंदा शिंदे सज्ज**
- **राणेंच्या आरोपानं राजकारणात खळबळ**
- **फडणवीस–शिंदे तणाव उघडपणे जाणवू लागला**
- **निकाल ठरवणार महायुतीतली खरी ताकद**

**शिंदेंच्या तब्बल ५३ सभा**
**देवेंद्र फडणवीसांच्या ३७ सभा**

दोन सत्ताधारी नेते थेट रिंगणात उतरल्याने संपूर्ण निवडणूक राज्यस्तरीय रंगात रंगली. भाजपनं राज्यभर स्वबळाचा नारा देत अनेक ठिकाणी युतीची दारे बंद ठेवली. त्याच वेळी शिंदेंनीही विविध पक्षांशी हातमिळवणी केली—काही ठिकाणी तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेशीदेखील! म्हणजेच शिंदेसेनेनं स्थानिक गणितं लक्षात घेऊन निश्चितच यंदा अधिक लवचिक भूमिका घेतली

**अमित शहांचा संकेत: भाजप २०२९ मध्ये स्वबळावरच**

भाजपचा महत्त्वाचा संकेत अमित शहांच्या विधानातून आधीच मिळाला होता— "२०२९ मध्ये भाजप स्वबळावर लढणार. कुबड्यांची गरज नाही." या संदेशाचं सखोल वाचन करत प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी अनेक ठिकाणी मित्रपक्षांना जागा न देता थेट आघाडी घेतली. याच खेळीचं अचूक वाचन शिंदेंनी यंदा केलं—आणि त्यांनीसुद्धा दमदार प्रत्युत्तर म्हणून भाजपच्या तोडीस तोड ग्लॅडिअटर पद्धतीनं सभा, दौरे आणि यंत्रणा राबवली.

**सभांमध्ये थेट फोनवरून आश्वासनं — शिंदेंची वेगळी स्टाइल**

अनेक सभांमध्ये शिंदेंनी थेट मंत्र्यांना फोन लावून स्पीकरवर ठेवले. स्थानिकांना प्रत्यक्ष ऐकू येईल अशापद्धतीनं आश्वासनं देऊन त्यांनी लोकांना प्रभावित केलं. ही शैली 'देवाभाऊ पॅटर्न' म्हणून चर्चेत आली.

**२०१५ ची आठवण ,यंदाची तयारी**

२०१५ मधील कल्याण–डोंबिवली महापालिका निवडणुकीत शिंदेंची अपेक्षा होती की भाजप–शिवसेना युतीतच लढेल. पण फडणवीस यांनी अनपेक्षितपणे भाजपला स्वबळावर उतरवण्याचा निर्णय घेतला. हा शिंदेंसाठी मोठा धक्का होता. प्रतिस्पर्धी परिस्थितीतही शिवसेनेनं ५२ जागा जिंकून महापालिका राखली

**पैशांच्या बॅगा पकडल्या**

प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यावर थेट गंभीर आरोप. या घटनेनं दोन्ही पक्षातील संघर्ष किती उग्र झाला आहे याची झलक मिळाली. सुप्त संघर्ष आता उघडपणे दिसू लागला. मुख्यमंत्री फडणवीस आणि शिंदे यांच्यातील राजकीय समीकरण गेल्या काही महिन्यांपासून धूसर होत चाललं आहे. स्थानिक निवडणुका आल्यावर हा ताण अधिक प्रकर्षाने जाणवू लागला. एकमेकांविषयी थेट बोलणं टाळलं तरी दोघांच्या रणनिती, पावले आणि निवडणूक पॅटर्नवरून संघर्ष उघड दिसत आहे. २१ डिसेंबरला लागणारा निकाल

## निकालांचे महत्त्व — कोणाचा पॅटर्न यशस्वी?

भाजपची स्वबळाची तयारी राज्यभर कितपत फळाला आली? शिंदेंचा झंझावात किती ठिकाणी प्रभावी ठरला? या सर्व प्रश्नांची उत्तरे २१ डिसेंबर रोजी समोर येतील. ही निवडणूक केवळ नगर परिषद किंवा पंचायत मर्यादित नाही. महाराष्ट्रातील पुढील राजकीय दिशा यातून ठरेल. असमंमत असलेल्या महायुतीच्या भवितव्यावरही याचा मोठा परिणाम होणार आहे.

## परवानगीचे आवाहन

## फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तंबी

# PMRDA चा आरएमसी प्लँटवर हातोडा!

## परवानगी घेऊन बांधकाम करावे

।पुणे।
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) ने अनधिकृत बांधकाम व्यावसायिकांविरुद्ध कडक भूमिका घेतली आहे. नियमबाह्यपणे सुरू असलेल्या रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्लँटविरोधात विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून, या कारवाईची सुरुवात मुळशी तालुक्यातील मौजे जांबे येथील 'मिलेनियम आरएमसी प्लँट'वर धडक कारवाई करून झाली.**



पीएमआरडीएच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने १ डिसेंबर २०२५ रोजी या अनधिकृत (ILLEGAL CONSTRUCTION) प्लँटवर कारवाई करताना पोकलेन मशीनच्या सहाय्याने प्लँटचे लोखंडी पत्राशेड व आरसीसी वॉल तोडले. त्यानंतर संपूर्ण प्लँट सीलबंद करण्यात आला. परवानगीशिवाय हा प्लँट पुन्हा सुरू केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर नियोजन अधिनियम 1966 (एमआरटीपी) अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, अशी कडक ताकीद मिलेनियम प्लँट व्यवस्थापनाला देण्यात आली आहे. या कारवाईनंतर परिसरातील इतर अनधिकृत आरएमसी प्लँटवरही लवकरच हातोडा पडणार आहे. महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे आणि पोलिस अधीक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडली. कारवाईत सह-आयुक्त डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील, यांनी सहभाग घेतला. सह-आयुक्त डॉ.दीप्ती सूर्यवंशी-पाटील यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत कार्यरत सर्व आरएमसी प्लँटधारकांनी आवश्यक परवानगी घेऊनच बांधकाम व्यवसाय सुरू करावेत, असे आवाहन केले आहे.पुरंदरमधील अनधिकृत प्लॉटिंगविरोधात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए)च्यावतीने जोरदार कारवाई सुरू असून, गेल्या दोन दिवसांत तीन गावांमध्ये कारवाई करण्यात आली.या कारवाईमुळे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे हद्दीमध्ये होणाऱ्या अनधिकृत प्लॉटिंगला आळा बसणार आहे. तसेच, सोमवारी (दि.24)देखील ही कारवाई सुरूच राहणार असल्याचे सहआयुक्त डॉ. दिप्ती सूर्यवंशी-पाटील यांनी सांगितले. अनधिकृत प्लॉटिंगमुळे नागरिकांची फसवणूक होत असल्याने, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे कार्यालयास अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत, प्राधिकरणामार्फत मोहिम हाती घेण्यात आली आहे. या अनुषंगाने पुरंदर तालुक्यातील १५ गावांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात

## पुरंदरमध्ये धडक कारवाई

सह-आयुक्त डॉ.दीप्ती सूर्यवंशी-पाटील यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत कार्यरत सर्व आरएमसी प्लँटधारकांनी आवश्यक परवानगी घेऊनच बांधकाम व्यवसाय सुरू करावेत, असे आवाहन केले आहे.पुरंदरमधील अनधिकृत प्लॉटिंगविरोधात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए)च्यावतीने जोरदार कारवाई सुरू असून, गेल्या दोन दिवसांत तीन गावांमध्ये कारवाई करण्यात आली.

आले असून, त्यानुसार, दि.१९ नोव्हेंबरपासून पुरंदर तालुक्यातील अनधिकृत प्लॉटिंगविरोधात जोरदार कारवाई सुरू आहे. त्यामध्ये गेल्या दोन दिवसांत तीन गावांमध्ये कारवाई झाली. या कारवाईमुळे पीएमआरडीए हद्दीमध्ये होणाऱ्या अनधिकृत प्लॉटिंगला आळा बसणार आहे.पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए)ने अनधिकृत बांधकाम व्यावसायिकांविरुद्ध कडक भूमिका घेतली आहे. नियमबाह्यपणे सुरू असलेल्या रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्लँटविरोधात विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून, या कारवाईची सुरुवात मुळशी तालुक्यातील मौजे जांबे येथील 'मिलेनियम आरएमसी प्लँट'वर धडक कारवाई करून झाली.पीएमआरडीएच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने १ डिसेंबर २०२५ रोजी या अनधिकृत (ILLEGAL CONSTRUCTION) प्लँटवर कारवाई करताना पोकलेन मशीनच्या सहाय्याने प्लँटचे लोखंडी पत्राशेड व आरसीसी वॉल तोडले. त्यानंतर संपूर्ण प्लँट सीलबंद करण्यात आला. परवानगीशिवाय हा प्लँट पुन्हा सुरू केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर नियोजन अधिनियम 1966 (एमआरटीपी) अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, अशी कडक ताकीद मिलेनियम प्लँट व्यवस्थापनाला देण्यात आली आहे. या कारवाईनंतर परिसरातील इतर अनधिकृत आरएमसी प्लँटवरही लवकरच हातोडा पडणार आहे. महानगर आयुक्तदक्षता अधिकारी अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडली.

# नगरपंचायत निवडणुकीसाठी मतदारांची गर्दी

## निवडणुकांसाठी राज्यभरात सकाळी 7 वाजता मतदानास सुरुवात

। पुणे ।
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**वडगाव नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक 2025 साठी आज मतदानाची प्रक्रिया उत्साहात पार पडत असून सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्यभरात सकाळी 7 वाजता मतदानास सुरुवात झाली. वडगाव शहरातही मतदानाचा वेग चांगला असून अनेक केंद्रांवर सकाळपासूनच रांगा दिसू लागल्या.**



निवडणूक आयोगाने केलेल्या योग्य नियोजनामुळे मतदान प्रक्रिया शांततेत आणि सुरळीतरीत्या सुरू आहे. मतदानासाठी नागरिकांना विविध केंद्रांवर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून निवडणूक अधिकारी परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहेत. सकाळी 7.30 ते दुपारी 3:30 वाजेपर्यंत 61.43 टक्के मतदानाची आकडेवारी राहिली आहे. यामध्ये दुपारी साडेतीन वाजेपर्यंत एकूण मतदान हे 12 हजार 192 आहे. यामध्ये 6 हजार 174 हे पुरुष तर 6 हजार 18 महिलांचे मतदान राहिले आहे. दुपारी 1.30 पर्यंत जवळपास 46 टक्क्यांच्या आसपास मतदान झाल्याची माहिती निवडणूक अधिकारी मनिषा तेलभाते यांनी दिली आहे. पहाटेपासूनच मतदारांमध्ये चांगला उत्साह असल्याने मतदानाचा वेग अपेक्षेपेक्षा अधिक असल्याचेही त्या म्हणाल्या.सकाळच्या थंड वातावरणातही नागरिकांनी मतदान केंद्रांकडे लवकरात लवकर धाव घेतली. ज्येष्ठ नागरिकांपासून तरुणांपर्यंत सर्वांनी मतदानात सहभाग घेतला. काही केंद्रांवर महिलांची मोठी उपस्थितीही दिसली.

## मतदारांमध्ये वाढता उत्साह

दुपारनंतर मतदानाचा वेग आणखी वाढेल, अशी अपेक्षा निवडणूक प्रशासनाने व्यक्त केली आहे.मतदान सुरळीत पार पाडण्यासाठी शहरभर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. संवेदनशील केंद्रांवर विशेष पथके ठेवण्यात आली असून मतदान प्रक्रियेमध्ये कोणतीही अडचण येऊ नये म्हणून सतत गस्त सुरू आहे.निवडणूक प्रशासनाने सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले आहे. "लोकशाहीला बळ देण्यासाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे. मतदान करून योग्य उमेदवाराची निवड करा," असे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले.

जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान

## सायन्स पार्कमध्ये रोबोटिक्स एक्सलन्स सेंटर

# कोडिंगपासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत प्रशिक्षण!

### विद्यार्थ्यांसाठी ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही सुरू, सप्ताहांत कार्यशाळांतून प्रत्यक्ष अनुभवाची संधी

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क आणि प्लॅनेटेरियमच्या पुढाकाराने नागरी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रात कोडिंग, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार असून ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली आहे.**




कार्यक्रमास सायन्स पार्कचे संस्थापक संचालक प्रवीण तुपे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रद्धा खंपरिया, लीडरशिप फॉर इक्विटीचे संस्थापक मधुकर रेड्डी आणि रोबोटेक्स इंडियाच्या पायल मनन उपस्थित होते. हा उपक्रम लीडरशिप फॉर इक्विटी आणि रोबोटेक्स इंडियाच्या सहकार्याने राबविण्यात आला आहे.

शिक्षणाचे महत्त्व – पुढील रोबोटिक्स लॅबमध्ये विद्यार्थ्यांना बेसिक ते ॲडव्हान्स कोडिंगचे प्रशिक्षण दिले जाणार असून, शनिवार, रविवार आणि संध्याकाळच्या वेळेत विशेष कार्यशाळा आयोजित केल्या जाणार आहेत. या सुविधा महापालिका तसेच खासगी शाळांतील विद्यार्थ्यांसाठी खुल्या आहेत.

कोणाचा पॅटर्न यशस्वी?

> महापालिका आयुक्त शेखर सिंह म्हणाले, "कृत्रिम बुद्धिमत्तेचे आणि नवीन तंत्रज्ञानाचे शिक्षण ही काळाची गरज आहे. काही देशांमध्ये हे शिक्षण प्राथमिक स्तरापासून सुरू होते. पिंपरी-चिंचवडमध्ये अशी सुविधा उपलब्ध होणे ही मोठी पावले आहे."
> **-शेखर सिंह,** महापालिका आयुक्त

**रोबोटिक्स व एआयचे प्रशिक्षण शहरातील विद्यार्थ्यांसाठी सुरु**

**सप्ताहांत विशेष कार्यशाळा,**

**महापालिका व खासगी शाळांना प्रवेश**

**विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धांसाठी तयार करण्याचे उद्दिष्ट**

# खोदकामामुळे डिलक्स चौक-काळेवाडी रस्त्याची दुरवस्था

### नागरिक त्रस्त; अपघातांचा धोका वाढला, महापालिकेकडे तातडीच्या दुरुस्तीची मागणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'डिलक्स चौक ते काळेवाडी मुख्य रस्त्यावर महापालिकेच्या जलनिस्सारण वाहिनीच्या कामानंतर रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. गेल्या महिनाभरापासून रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने खड्डे आणि चिखलामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. परिसरातील रहिवाशांनी तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली असून, अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.**



काळेवाडी मुख्य रस्ता हा वाहतुकीसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. दररोज हजारो वाहने आणि पादचारी या मार्गाने प्रवास करतात. मात्र, खोदकामानंतर रस्त्याची पृष्ठभाग दुरुस्त न झाल्याने पावसाळ्यात खड्ड्यांची संख्या वाढली आहे. चिखलामुळे दुचाकी घसरून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत.

स्थानिक रहिवासी म्हणाले, "महापालिकेने रस्ता खोदला, पण तो पुन्हा नीट करण्याची तसदी घेतली नाही. पावसामुळे खड्डे आणि चिखल वाढले आहेत, यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत."

कायदा काय सांगतो? महाराष्ट्र महापालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ६३ आणि ६४ नुसार रस्ते, गटारे आणि पाणीपुरवठा यांसारख्या पायाभूत सुविधांची देखभाल आणि दुरुस्ती करणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. खोदकामानंतर रस्त्याची दुरुस्ती न करणे हे या तरतुदींचे उल्लंघन मानले जाते.

**खड्डे आणि चिखलामुळे वाहतूक विस्कळीत**

**महापालिकेच्या हलगर्जीपणावर नागरिक संतप्त**

**तातडीने दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा**

# आस्था विश्वकल्याणरुपी असावी



भूमिका



**या ना अश्या अनेक गोष्टी आहेत आपल्या महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायात आणि त्यांच्याशी निगडित साहित्यात खरे तर यावर हजारो कोटी खर्च व्हायला हवा परंतु काही कालखंडानंतर येणाऱ्या कुंभ मेळ्यांवर हजारो कोटी खर्च करणार ज्यातून खरच काय निष्पन्न होत हे खरच कुणीही जबाबदारीने सांगू शकत नाही.**

समाज हित जोपासणाऱ्या अश्याच प्रकारच्या साधू संतांची मांदीयाळी आपल्या महाराष्ट्रात होऊन गेली आणि त्यातल्या त्यात वारकरी संप्रदाय म्हणजे आध्यात्मातील ती खरी वाट जी समाजाला खरे प्रबोधन प्राप्त करुन देते. हा संप्रदाय सर्वांसाठी खुला आहे. यात जातीयभेद, श्रीमंती किंवा गरिबी असा कोणताही भेदभाव नाही. संत ज्ञानेश्वर माऊलींनी याच वारकरी संप्रदायाचा पाया रचला. त्यांनी अद्वैत तत्त्वज्ञान लोकांना सहजसोप्या पद्धतीने समजावून सांगितले. असा संत ज्यांना माऊली म्हणून संबोधन केले कारण माते समान संपूर्ण विश्वाच्या कल्याणा करिता आपल्या लेकरा सम आर्ततेने भगवंताला मागने पसायदानाच्या माध्यमातुन घातले आणि त्यातुन जी विश्वकल्याणाची पोटतिडका आहे ती आपल्या लक्ष्यात येते ती एका मातेचीच असू शकते.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी, संत एकनाथांचे भागवत आणि संत तुकारामांची अभंगगाथा या ना अनेक संतांचे लिखान हे समाज प्रबोधनाकरिता आजही मार्गदर्शक आहे आणि यांच्या शिकवणीनं मधे कुठलिही पूजा पाठ किंवा कुठलेही थोतांड याला कुठलाही थारा नाही.

कांदा मुळा भाजी । .
अवघी विठाबाई माझी ॥ १ ॥
लसूण मिरची कोथिंबिरी ।
अवघा झाला माझा हरी ॥ २ ॥

संत सावतामाळी म्हणतात ना की माझ्या कामात कर्मात आणि माझ्या मळ्यातच विठ्ठलाचा वास आहे, हाच दृष्टिकोन समाजाला आत्मसात करण्याची आज खरी गरज आहे.

वारकरी मंदिराचे संत बहिणाबाईंनी जे वर्णन केले आहे त्याप्रमाणे – ज्ञानदेवांनी पाया रचला, नामदेवांनी विस्तार केला, एकनाथांनी खांब दिला, तुकोबा कळस झाले व बहिणाबाई पताका झाल्या. म्हणजे यांची जर यादी केली तर संत ज्ञानेश्वर ,संतनामदेव ,संतजनाबाई,संत निवृत्तीनाथ , संत मुक्ताबाई ,संत सोपानकाका

संत चोखामेळा ,संत सोयराबाई ,संत सावता माळी ,संत गोरोबा काका ,संत नरहरी सोनार ,संत सेना न्हावी ,संत निर्मळा ,संत बंका,संत कर्ममेळा,परिसा भागवत ,संत नामदेव महाराजांचा परिवार ,विसोबा खेचर,संत दामाजीपंत,संत कूर्मदास ,संत कान्होपात्रा ,संत भानुदास ,संत एकनाथ,संत तुकाराम,संत बहिणा बाई ,संत शेख महंमद,संत निळोबाराय,संत माणकोजी बोधले, रामेश्वर भट वाघोलीकर ,तुकोबांचे बंधू कान्होबा,संत कबीर,संत मीराबाई ह्या ना अनेक संत व सत्पुरुषांची मांदीयाळी होऊन गेलीय ज्यांनी समाज प्रबोधन केले कुठलेही कर्मकांड न करता. आज यांचं साहित्य आणि यांच्याशी निगडित वास्तुंच, वस्तूंच खऱ्या अर्थाने जतन व्हायला हवे.

“अरे खोप्यामंदी खोप गेला, सुगरणीचा चांगला, देख पिलासाठी तिनं झोका झाडाले टांगला. तिची उलूशीच चोचं, तेच दात तेच ओठ, तुले देले रे देवाने, दोन हात दहा बोटं.” आपण आपल्या मनगटावर विश्वास ठेवायला हवा नाकी नुसते दैवावर निर्भर राहावे , संत बहिणाबाई म्हणतात किती आत्मचिंतन करण्यास भाग पडणाऱ्या ओळी आहेत . या ना अनेक साहित्याचा साठा मानवी कल्याणा करिता प्रेरणादायी ठरेल असा आहे यांचा शालेय अभ्यासक्रमात निश्चितच समावेश व्हायला हवा. आपल्या महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायात आणि त्यांच्याशी निगडित साहित्यात खरे तर यावर हजारो कोटी खर्च व्हायला हवा परंतु काही कालखंडानंतर येणाऱ्या कुंभ मेळ्यांवर हजारो कोटी खर्च करणार ज्यातून खरच काय निष्पन्न होत हे खरच कुणीही जबाबदारीने सांगू शकत नाही, कुंभ स्नानामध्ये जर कोटींच्या संखेमध्ये लोकांची आवक होते तर मुठभर दगड-माती जरी लोकांनी नेली तर पात्र स्वच्छ आणि मोठं होईल परंतु याउलट तिथे ढीगभर खचरा, विष्ठा टाकून त्याच नदीच्या पवित्र पात्राला अशुद्ध , घान करुन आपण आपले पावित्र्य जपण्याचा आंधळा प्रयत्न करतोय, सोबतच शासन- प्रशासन हजारो वृक्षांची कत्तल देखील करणार यातून फक्त निसर्गाची हानी होणार पर्यायाने माणसाचीच.

## प्रासंगिक »

### भारतातून निर्यात ?

***भारतीय ट्रकचालक चर्चेत येण्याच्या दोन घटना अलीकडे अमेरिकेतही घडल्या.***

गस्ट महिन्यात फ्लोरिडा राज्यात हरजिंदर सिंग या चालकाने एका महामार्गावर, तो चालवत असलेल्या महाकाय ट्रकनेचे झटक्यात उलटवळण (यू-टर्न) घेण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारचे वळण त्या महामार्गावर अवैध होते. हे वळण घेताना हरजिंदरच्या ट्रकवर मागून येणारे एक वाहन आदळले, ज्यात वाहनातील तीन प्रवाशांचा मृत्यू झाला. ऑक्टोबर महिन्यात कॅलिफोर्निया राज्यात जशनप्रीत सिंग या चालकाचा ट्रक अनियंत्रित झाल्याने पुढील काही वाहनांना तुडवत गेला. यात तीन प्रवाशांचा मृत्यू झाला. जगभरातील प्रगत देशांमध्ये सर्वाधिक रोजगारेच्छुकांची निर्यात करणाऱ्या देशांमध्ये भारताचे नाव अग्रस्थानी आहे. ही निर्यात कौशल्यधारींबरोबर हरकाम्यांचीही असते. पण येथून बेकायदा बाहेर पडून इतर देशांतही बेकायदा मार्गाने प्रवेशणाऱ्या किंवा तेथे जाऊन बेकायदा कृत्यांत सहभागी होणाऱ्यांवर जेव्हा ‘भारतीय’ असा शिक्का बसतो, तो केवळ येथील सरकारसाठीच नव्हे, तर परदेशांत वैध मार्गाने स्थिरावून कर्तृत्व गाजवणाऱ्या भारतीयांसाठीही अन्यायकारक ठरतो.

एआयच्या संदर्भातली म्हटलं तर गमतीची आणि म्हटलं तर खूप गंभीर अशी एक गोष्ट असते ती म्हणजे एआयला भास होण्याची! हे वाचून आपण कदाचित चक्रावूनच जाऊ.कधीकधी माणसांना भास होतात, हे आपण ऐकलेलं असेल. इतकंच नव्हे तर आपल्यालाही कधीतरी एखादा भास होतो.

## एआय आपण जे प्रशिक्षण देऊ, त्यावर चालतं

अस्तित्वात नसलेल्या गोष्टी किंवा वस्तू दिसल्या असं आपल्याला वाटतं किंवा काहीतरी ऐकू आलं असं वाटतं. हे सगळे हमखास मनाचे खेळ असतात हेसुद्धा विज्ञानानं सिद्ध केलेलं आहे. या पार्श्वभूमीवर अस्तित्वात नसलेलं किंवा सत्य नसलेलं सत्य आहे, असं एआयला वाटू शकतं. इतकंच नव्हे तर एखाद्या बंडलबाज माणसानं त्याला वस्तुस्थिती ठाऊक नसताना कुठल्या तरी विषयावर आपण तज्ज्ञ असल्याचा आव आणून मोठी ‘फेकाफेकी’ करावी तसा प्रकारसुद्धा एआय करायला लागतं । या भन्नाट प्रकाराला मनोविज्ञानाच्या भाषेत ‘हॅल्युसिनेशन’ म्हणतात. तर आता हीएआयचं तंत्रज्ञान त्याला आपण जे प्रशिक्षण देऊ, त्याच्या आधारावर चालतं. जेव्हा आपण एआयला त्याला दिलेल्या प्रशिक्षणाबाहेरचा एखादा प्रश्न विचारतो तेव्हा काय होतं? हेच समजा एखाद्या माणसाच्या बाबतीत घडलं तर काय होईल ? अर्थातच अशा वेळी त्या माणसानं आपल्याला




या विषयामधलं काही माहीत नसल्याचं सांगून मोकळं व्हावं; अशी आपली अपेक्षा असते. असं न करता समजा त्या माणसाने आपण या विषयामधले जाणकार असल्याचा आव आणला तर याचे परिणाम साधी फसगत होण्यापासून प्रचंड मोठी दिशाभूल होईपर्यंत काहीही होऊ शकतात. एआयच्या बाबतीतसुद्धा हेच घडतं. जर एआयला आपण विचारलेल्या प्रश्नांच्या संदर्भात काहीही ठाऊक नसेल किंवा एकदम जुजबी ज्ञान असेल तर खरं म्हणजे एआयनं तसं आपल्याला सांगावं, अशी आपली रास्त अपेक्षा असते. प्रत्यक्षात मात्र एआय असं न करता सरळसरळ ‘बंडला’ मारायला लागतं. ठाऊक नसलेल्या गोष्टी ते काहीही रचून आपल्याला सांगायला लागतं. अथर्थात एखाद्या माणसानं असं करणं आणि एआयनं ते करणं यात सूक्ष्म फरक आहेच. माणूस जेव्हा असे करतो तेव्हा तो ते जाणूनबुजून करतो. म्हणजेच आपल्या माहिती/ज्ञानामधली कमतरता झाकणं, आपल्याला हे कळत नसल्यामुळे आपली नोकरी जाईल का अशा प्रकारची भीती वाटणं, कधीकधी बिलंदरपणे चलाखी करून थापा मारणं असं काहीही यामागे असू शकतं. एआयमध्ये मात्र माणसासारखा असा सारासार विचार नसल्यामुळे हे एआयच्या हातून अजाणतेपणानं घडतं. म्हणजे त्यामागे बेमालूपणे केलेली फसवाफसवी नसते. काहीही असो. एआयच्या या थापेबाजीमुळे विलक्षण मोठे प्रश्न निर्माण होऊ शकतात. कारण एआयच्या या उत्तरानुसार आपण कृती करणं किंवा त्या माहितीवर विसंबून राहणं एकदम निर्धोक कसं म्हणता येईल?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## हायकोर्टाचा आदेश मतदान केल्यावर १८ दिवस होणार काथ्याकूट

# मतदान : मतमोजणी आज नाही!

## २१ डिसेम्बरला होणार मतमोजणी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील काही पालिका निवडणुका दुसऱ्या टप्प्यात होणार असल्याने होणाऱ्या निवडणुकांची मतमोजणी उद्या होणार नसून आता ती २१ डिसेंबर रोजी होणार असल्याचा आदेश उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आज सकाळी दिला आहे.**



या प्रकरणी नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती त्यावर आज सकाळी खंडपीठाने निकाल देताना उद्याची मतमोजणी रद्द केली असून आता दोन्ही टप्प्यातील मतदान झाल्यावर म्हणजे २१ डिसेंबर रोजी करण्याचे आदेश दिले आहेत. सगळ्या नगर पालिकांचे मतदान व्यवस्थित पार पडल्यावर मतमोजणी एकाच दिवशी व्हावी ,३ तारखेला निकाल आल्यास त्याचा नंतर होणाऱ्या मतदानावर मोठा परिणाम होऊ शकतो ,त्यासाठी मतदान प्रक्रिया मुक्तपणे पारदर्शी पार पडावी अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. त्यावर आज उसाचं न्यायालयाने निकाल दिला आहे. आचार संहिता आता २० डिसेंबर पर्यंत सुरु राहणार असून निवडणूक चाचण्यांना सुद्धा परवानगी देण्यात आली आहे. नऊ वर्षांनंतर होणाऱ्या राज्यातील २५० पेक्षा अधिक नगरपालिका आणि नगर पंचायतींसाठी मंगळवारी मतदान होत आहे. न्यायप्रविष्ट प्रकरणांमुळे २४ नगरपालिका आणि १५४ सदस्यांच्या निवडीसाठी आता २० डिसेंबरला मतदान होईल. परंतु ३ तारखेला होणारी मतमोजणी एकत्रित करणे शक्य आहे का अशी विचारणा औरंगाबाद खंडपीठाच्या न्या. विभा कंकणवाडी व न्या. हितेन वेणेगावकर यांनी निवडणूक आयोगाकडे केली होती. राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींसाठी निवडणूक जाहीर झाली होती. काही ठिकाणी निवडणुका बिनविरोध पार पडल्या. कायदेशीर पेच निर्माण झाल्याने राज्य निवडणूक आयोगाने २४ संपूर्ण नगरपालिका तर १५० पेक्षा अधिक प्रभागांमधील निवडणूक स्थगित केली. या निवडणुकीत एक कोटीपेक्षा अधिक मतदार मतदानाचा हक्क बजाविणार आहेत. न्यायप्रविष्ट प्रकरणांमुळे २४ नगरपालिका आणि १५४ सदस्यांच्या निवडीसाठी मंगळवारी होणारी निवडणूक लांबणीवर टाकण्याच्या राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयास उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. बुधवारची मतमोजणी रोखण्याच्या न्यायालयाच्या इशाऱ्यानंतर सर्व नगरपालिका आणि नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबरला घेण्याच्या हालचाली निवडणूक आयोगात सुरु होत्या. या प्रकरणी नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती त्यावर आज सकाळी खंडपीठाने निकाल देताना उद्याची मतमोजणी रद्द केली असून आता दोन्ही टप्प्यातील मतदान झाल्यावर म्हणजे २१ डिसेंबर रोजी करण्याचे आदेश दिले आहेत. सगळ्या नगर पालिकांचे मतदान व्यवस्थित पार पडल्यावर मतमोजणी एकाच दिवशी व्हावी ,३ तारखेला निकाल आल्यास त्याचा नंतर होणाऱ्या मतदानावर मोठा परिणाम होऊ शकतो ,त्यासाठी मतदान प्रक्रिया मुक्तपणे पारदर्शी पार पडावी अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती.

### पुन्हा मुख्यमंत्री नाराज

उद्याची मतमोजणी पुढे ढकलली असल्याचे कानावर येताच राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा यंत्रणेवर नाराजी व्यक्त केली आहे. कधी निवडणुका तर कधी मतमोजणी पुढे ढकलली जाते हे योग्य नाही. ज्यांनी निवडणुकीत मेहनत केली त्या कार्यकर्त्यांचा मोठा भ्रमनिरास होतो अशी प्रतिक्रिया फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

### राज्यात पोरखेळ सुरु

निवडणूक अयोग्य राज्य सरकारच्या हातचे खेळणे झाला आहे हे आता लपून राहिले नाही ,आधी काही निवडणुका रद्द करणे आणि आता मतमोजणी तब्बल १८ दिवस पुढे ढकलणे हा राज्यात काय पोरखेळ सुरु आहे असा सवाल काँग्रेसचे विधिमंडळ नेते आ. विजय वडेट्टीवार यांनी आज केला आहे. कदाचित काही सेटिंग राहिली असेल म्हणून निकाल लांबवला जात आहे असाही आरोप वडेट्टीवार यांनी केला.

# शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मोर्चा

## जुन्या पेन्शनसह विविध मागण्यांसाठी संघटना आक्रमक

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिक्षकांच्या जुन्या पेन्शनची मागणी धुळीस मिळवत राज्य शासनाने 1 सप्टेंबरच्या आदेशाद्वारे 2013 पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण करण्याची सक्ती घातली. या निर्णयाविरोधात जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर संघटनांमध्ये तीव्र असंतोष पिकांवर ग्रामीण अर्थव्यवस्था निर्माण झाला असून, या अन्यायकारक असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.**



या पृष्ठभुमीवर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या नेतृत्वात अकोला जिल्ह्यातील तब्बल 27 शिक्षक संघटना एकत्र येऊन शनिवारी (दि.5) शाळा बंद आंदोलन आणि जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. जुन्या पेन्शनची पुनर्बहाली, टीईटी सक्तीनिर्णयाचा पुनर्विचार आणि प्रलंबित मागण्यांसाठी एकवटलेला हा जिल्हास्तरीय मोर्चा ऐतिहासिक असल्याचे शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे. 2013 पूर्वी नियुक्त शिक्षकांवर टीईटीची सक्ती करणे अन्यायकारक असून, शासन त्यांच्या सेवाकाळाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संघटनांनी केला. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि संस्थाचालक यांनी शाळा एकदिवसीय बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी, १५ मार्च २०२४ चा संचमान्यता शासन निर्णय रद्द करावा, पदवीधर वेतनश्रेणी सर्वांना द्यावी. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती सुरू करावी, बीएलओ, ऑनलाइन-ऑफलाइन निवडणूक कामांपासून शिक्षकांना मुक्त करावे

### शाळा बंद आंदोलन

आता जुनी पेन्शन योजना तातडीने सुरू करण्यात येत आहे. या पृष्ठभुमीवर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या नेतृत्वात अकोला जिल्ह्यातील तब्बल 27 शिक्षक संघटना एकत्र येऊन शनिवारी (दि.5) शाळा बंद आंदोलन आणि जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे.

आदींचा समावेश आहे.महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, कास्ट्राईब शिक्षक संघटना, जुनी पेन्शन संघटना, जिल्हा परिषद माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षक संघ, विदर्भ खाजगी प्राथमिक शिक्षक संघ, शिक्षकेतर कर्मचारी संघटना, विभागीय शिक्षक संघ, स्वाभिमानी शिक्षक संघटना, खाजगी प्राथमिक संघटना, उर्दू शिक्षक संघटना, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, साने गुरुजी सेवा संघ, शिक्षण संस्थाचालक संघटना, प्रतिनिधी सभा,यासह विविध शिक्षक शिक्षकेतर संघटनांचा सहभाग राहणार आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्य सरकारचे कर्मचारी जुनी पेन्शन योजनेसाठी आग्रही असल्याचे दिसत आहे.

ब्रह्मोस नियंत्रण प्रणालीने सज्ज

ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्राचे यशस्वीरित्या प्रक्षेपण


# चीन-पाकिस्तानची वळणार बोबडी!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय लष्कराने बंगालच्या उपसागरातील परीक्षण क्षेत्रातून लांब पल्ल्याच्या ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्राचे प्रक्षेपण यशस्वीरित्या पार पाडले. दक्षिणी लष्कर (भारतीय लष्कर)कमांडच्या ब्रह्मोस युनिटने त्रिसेवा अंदमान-निकोबार कमांडच्या सहकार्याने ही अत्यंत समन्वयित मोहीम पूर्ण केली.**

## अंदमानच्या सहकार्याने मोहीम पूर्ण





अत्याधुनिक मार्गदर्शन आणि नियंत्रण प्रणालीने सज्ज असलेल्या या क्षेपणास्त्राने उच्च गतीने केलेली उड्डाण स्थिरता, मार्गदर्शन क्षमता आणि अंतिम टप्प्यातील अचूकता यशस्वीरीत्या सिद्ध केली. निर्धारित लक्ष्य अचूकपणे भेदून क्षेपणास्त्राने सर्व ऑपरेशनल उद्दिष्टे पूर्ण केली. या कामगिरीमुळे भारतीय लष्करातील ब्रह्मोस युनिट्सची सज्जता, युद्धस्थितीतील प्रतिसाद क्षमता आणि तत्काळ प्रिसिजन स्ट्राईक करण्याची ताकद आणखी अधोरेखित झाली. दक्षिण कमांडचे जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी यशस्वी प्रक्षेपणाबद्दल समाधान व्यक्त करत लष्कराच्या तांत्रिक क्षमतेचे कौतुक केले. ही यशस्वी मोहीम भारतीय लष्कराच्या लाँग-रेंज स्ट्राईक क्षमतेत मोठी भर घालणारी ठरली असून, भारताच्या स्वदेशी तंत्रज्ञानाची अचूकता आणि विश्वासार्हता पुन्हा एकदा सिद्ध करणारी आहे. आत्मनिर्भर भारत उपक्रमांतर्गत विकसित करण्यात आलेल्या स्वदेशी क्षेपणास्त्र प्रणालींच्या प्रगतीचे हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. भारतीय सैन्याने दक्षिण कमांडच्या नेतृत्वाखाली २८ ते २९ ऑक्टोबर २०२५ दरम्यान वाळवंटातील ड्रोन आणि काउंटर-ड्रोन सराव 'वायू समन्वय-II' यशस्वीरित्या पार पाडला. भविष्यातील युद्ध परिस्थितीसाठी सैन्याच्या तयारीची चाचणी घेणे आणि हवाई आणि भू-संपत्तीचा एकात्मिक वापर सुनिश्चित करणे हा दोन दिवसांचा सरावाचा उद्देश होता. 'वायू समन्वय-II' हा सराव सैनिकांना आधुनिक बहु-डोमेन कमांड आणि नियंत्रण प्रणालींसह प्रत्यक्षात काम करण्याचा व्यावहारिक अनुभव देण्यासाठी रचना करण्यात आला होता. या अभ्यासात आव्हानात्मक इलेक्ट्रॉनिक युद्ध आणि वास्तविक-जगातील लढाऊ परिस्थितींचे वास्तववदर्शी सराव करण्यात आला. सरावादरम्यान भारतीय सैन्याने ड्रोन आणि ड्रोनविरोधी

### तत्काळ स्ट्राईक करण्याची ताकद

भारतीय सैन्याने दक्षिण कमांडच्या नेतृत्वाखाली २८ ते २९ ऑक्टोबर २०२५ दरम्यान वाळवंटातील ड्रोन आणि काउंटर-ड्रोन सराव 'वायू समन्वय-II' यशस्वीरित्या पार पाडला. भविष्यातील युद्ध परिस्थितीसाठी सैन्याच्या तयारीची चाचणी घेणे आणि हवाई आणि भू-संपत्तीचा एकात्मिक वापर सुनिश्चित करणे हा दोन दिवसांचा सरावाचा उद्देश होता.

(C-UAS) ऑपरेशन्सशी संबंधित तत्त्वे व रणनीती विकसित करून त्यांची चाचणी केली — ज्यामुळे उदयोन्मुख हवाई धोक्यांचा मुकाबला करण्याची क्षमता अधिक बळकट झाली आहे.वाळवंटातील उष्ण हवामान आणि भूप्रदेशामुळे हा सराव आणखी आव्हानात्मक होता. या युद्ध सरावात, आर्म्ड, इन्फंट्री, तोफखाना आणि सिग्नल कॉर्प्ससारख्या लष्कराच्या विविध शाखांनी संयुक्तपणे भाग घेतला होता. या सरावामार्फत तंत्रज्ञानावर आधारित समन्वित युद्धाचे उत्कृष्ट सादरीकरण दिसून आले. या सरावात स्वदेशी ड्रोन तंत्रज्ञानाचाही यशस्वी वापर करण्यात आला. अत्याधुनिक मार्गदर्शन आणि नियंत्रण प्रणालीने सज्ज असलेल्या या क्षेपणास्त्राने उच्च गतीने केलेली उड्डाण स्थिरता, मार्गदर्शन क्षमता आणि अंतिम टप्प्यातील अचूकता यशस्वीरीत्या सिद्ध केली. निर्धारित लक्ष्य अचूकपणे भेदून क्षेपणास्त्राने सर्व ऑपरेशनल उद्दिष्टे पूर्ण केली. या कामगिरीमुळे भारतीय लष्करातील ब्रह्मोस युनिट्सची सज्जता, युद्धस्थितीतील प्रतिसाद क्षमता आणि तत्काळ प्रिसिजन स्ट्राईक करण्याची ताकद आणखी अधोरेखित झाली. दक्षिण कमांडचे जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी यशस्वी प्रक्षेपणाबद्दल समाधान व्यक्त करत लष्कराच्या तांत्रिक क्षमतेचे कौतुक केले. ही यशस्वी मोहीम भारतीय लष्कराच्या लाँग-रेंज स्ट्राईक क्षमतेत मोठी भर घालणारी ठरली असून, भारताच्या स्वदेशी तंत्रज्ञानाची अचूकता आणि विश्वासार्हता पुन्हा एकदा सिद्ध करणारी आहे.

# सरकारच्या संचारसाथी ॲपवरून गदारोळ

## अखिलेश यादव यांचा संचार साथी ॲपवरुन भाजपवर जोरदार निशाणा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्र सरकारच्या संचारसाथी ॲपवरून सध्या चांगलाच गदारोळ माजला आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनातही याचे पडसाद उमटल्याचे पाहायला मिळाले. त्याचवेळी समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि लोकसभा खासदार अखिलेश यादव यांनीदेखील संचारसाथी ॲपवरून केंद्रातील भाजप सरकारवर निशाणा साधला आहे. अखिलेश यादव यांनी ट्विटर एक्स वरून भाजपवर निशाणा साधला आहे.**

समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि लोकसभा खासदार अखिलेश यादव AKHILESH YADAV यांनी केंद्र सरकारच्या संचार साथी ॲपवरून भाजपवर जोरदार निशाणा साधला आहे. त्याचवेळी त्यांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. अखिलेश यादव यांनी, जर भाजप गेला तरच गोपनीयता वाचू शकेल, असा टोला लगावला आहे. तसेच, हेरगिरीचा (फितुरी) इतिहास असलेले हेरगिरी करणे कसे थांबवू शकतात? असेही टिकाही त्यांनी केली आहे.भाजप BJP सरकारच्या काळात अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आधीच अंकुश लावला जात आहे. त्यात आता कुटुंब, नातेवाईक, मित्र आणि



व्यावसायिक भागीदारांमधील संभाषण देखील भाजप नेते आणि त्यांच्या सहयोगींच्या गिधाडासारख्या नजरेखाली असेल. पण आता जनतेलाच भाजप नकोसा झाला आहे. ते भाजपला नकोय म्हणून भाजप गेली तरच जनतेची गोपनियता जपली जाईल." असही अखिलेश यादव यांनी म्हटलं आहे.दरम्यान, संचार साथी ॲपवरून गदारोळ माजल्यानंतर केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी, नको असल्यास युजर्स संचार साथी ॲप

### सरकारने काय म्हटले?

हे युजर्सच्या मनावर असल्याचे म्हटले आहे. सिंधिया म्हणाले, "जर तुम्हाला ते काढून टाकायचे असेल तर कृपया ते करा. देशातील प्रत्येकाला हे माहित नाही की हे ॲप त्यांना फसवणूक आणि चोरीपासून वाचवण्यासाठी आहे. हे ॲप सर्वांना उपलब्ध करून देणे ही आमची जबाबदारी आहे. जर तुम्हाला ते काढून टाकायचे असेल तर कृपया ते काढून टाका.

डिलीट करू शकतात. संचार साथी ॲप ठेवायचे की नाही ठरवण्याच अधिकार युजर्सला आहे.' असं म्हटलं आहे.नोंदवणारे ॲप, "संचार साथी", सर्व नवीन उपकरणांवर प्री-इंस्टॉल केलेले आहे आणि विद्यमान उपकरणांवर सॉफ्टवेअर अपडेटद्वारे प्रदान केले आहे याची खात्री करण्याचे निर्देश दिले आहेत.विभागाच्या २८ नोव्हेंबरच्या निर्देशानुसार, आदेश जारी झाल्यापासून ९० दिवसांच्या आत भारतात उत्पादित किंवा आयात केलेल्या सर्व मोबाइल फोनवर हे ॲप अनिवार्य असेल. सर्व मोबाइल फोन कंपन्यांना १२० दिवसांच्या आत दूरसंचार विभागाला अनुपालन अहवाल सादर करणे आवश्यक असल्याचे या निर्देशात म्हटले होते.

# सिनेमागृहात जन्म, आईने 'कश्मिरा' नाव ठेवलं?

'स्टार प्रवाह' वाहिनीवरील 'लग्नानंतर होईलच प्रेम' ही मालिका घराघरांत लोकप्रिय आहे. या मालिकेत मृणाल दुसानीस, ज्ञानदा, विवेक सांगळे, विजय आंदळकर, ऋजुता कुलकर्णी अशी जबरदस्त स्टारकास्ट पाहायला मिळत आहे. या मालिकेत रम्या ही खलनायिकेची भूमिका अभिनेत्री कश्मिरा कुलकर्णी साकारत आहे. कश्मिराने नुकतीच 'राजश्री मराठी'च्या 'तिची गोष्ट' या शोमध्ये उपस्थिती लावली होती. यावेळी अभिनेत्रीने तिच्या जन्माचा व नावामागचा खास किस्सा चाहत्यांना सांगितला. कश्मिराचा जन्म सिनेमागृहात झालाय, याबद्दल सांगताना अभिनेत्री म्हणाली "माझी आई गरोदर होती आणि माझ्या आई-बाबांच्या लग्नाचा वाढदिवस सुद्धा त्याचदरम्यान होता. त्यामुळे लग्नाच्या वाढदिवसानिमित्त त्या दोघांनी सिनेमाला जायचं ठरवलं होतं. पण, त्याचवेळी माझ्या आईला काश्मीरला जायचं होतं. अर्थात, आई गरोदर असल्याने डॉक्टरांनी प्रवास करण्याचा सल्ला दिला नव्हता. म्हणून मग ते दोघं सिनेमाला गेले होते."त्यावेळी 'नाचे मयूरी' हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. त्यादरम्यान आईला प्रसुतीकळा सुरू झाल्या आणि माझा सिनेमागृहात जन्म झाला. आई-बाबांना तेव्हा काश्मीरला जाता आलं नाही म्हणून आणि सिनेमा पाहताना माझा जन्म झाला... हा सगळा विचार करून आईने माझं नाव कश्मिरा ठेवलं. सिनेमागृहात जन्म झाल्याने ही हिरोईन होणार असं आईने आधीच ठरवलं होतं आणि पुढे ही हिरोईन झाली तर कश्मिरा हे नाव शोभेल हा सुद्धा विचार करून तिने माझं नाव ठेवलं होतं." असं अभिनेत्रीने सांगितलं. कश्मिराला समाजकार्याची आवड आहे. नुकतीच पंढरपूरच्या वारीत सहभागी होऊन अभिनेत्री वारकऱ्यांची सेवा करताना दिसली. याबद्दल कश्मिरा सांगते, "माझ्या आईची इच्छा होती की, मी अभिनय क्षेत्रात काम केलं पाहिजे. माझी अशी इच्छा कधीच नव्हती. मला बिझनेस आणि समाजकार्यात फार रस आहे."दरम्यान, कश्मिराने आजवर अनेक मराठी चित्रपटांमध्ये काम केलेलं आहे. वर्षभरापूर्वी तिने 'कलर्स मराठी'च्या 'काव्यांजली' मालिकेत प्रमुख भूमिका साकारली होती. सध्या अभिनेत्री 'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेत रम्या हे पात्र साकारत आहे. 'स्टार प्रवाह' वाहिनीवरील 'लग्नानंतर होईलच प्रेम' ही मालिका घराघरांत लोकप्रिय आहे. या मालिकेत मृणाल दुसानीस, ज्ञानदा, विवेक सांगळे, विजय आंदळकर, ऋजुता कुलकर्णी अशी जबरदस्त स्टारकास्ट पाहायला मिळत आहे.



# स्टँडअप कॉमेडीमुळे वाद

विनोद हा खरंतर खळखळून हसायला भाग पाडतो. पण गेल्या काही दिवसांत विनोदामुळे हसण्यावर बंधनं आली आहेत. आक्षेपार्ह जोक, भाषा किंवा शब्द या साऱ्यामुळे 'स्टँडअप कॉमेडी' हा कलाप्रकार चर्चेचा विषय ठरत आहे. खरंतर स्टँड अप कॉमेडी म्हटली की, अनेकांच्या चेहऱ्यावर हमखास हसू येतं. पण गेल्या काही महिन्यांत स्टँडअप कॉमेडीमुळे वाद निर्माण झाल्याचं पाहायला मिळत आहे. स्टँडअप कॉमेडी शोमध्ये प्रेक्षकांची मस्करी केली जाणं, त्यांच्यावर जोक करणं किंवा विनोदाअडून कोणावर तरी टीका करणं हे सर्रास होत असतं. त्यामुळे कधीकधी प्रेक्षकांनी जोकवर हसण्याऐवजी वाद होत असल्याचे पाहायला मिळत आहे. या सर्व परिस्थितीवर मराठी अभिनेत्रीनेही तिचं मत व्यक्त केलं आहे. यावेळी तिने दुसऱ्यावर विनोद करणं म्हणजे कॉमेडी नाही असं स्पष्टपणे म्हटलं.मराठी अभिनेत्री अनुजा साठेने आरपारला दिलेल्या मुलाखतीत आजच्या कॉमेडीबद्दल तिचं मत व्यक्त केलं. याबद्दल अनुजा असं म्हणाली, "काही कॉमेडीयन्स आहेत, ज्यांचे विनोद मला आवडतात. काही मराठी मुलंही आहेत, जे खूप चांगली कॉमेडी करतात. अनेक स्टँडअप कॉमेडी शो हे खरंच विनोदी असतात. पण काही वेळेस कोणावर तरी विनोद केले जातात आणि ते करणं म्हणजे कॉमेडी नाही."यानंतर ती म्हणाली, "दुसऱ्यावर जोक करणं याला कॉमेडी म्हणत नाहीत. प्रसंगनिष्ठ जोक असेल तर मला आवडतं. मी एक उदाहरण सांगते, कपिल शर्माच्या शोमध्ये मी तीनवेळा गेले आहे आणि या तिन्ही वेळेस जी प्रहसने झाली.

# 'द ग्रेट शम्सुद्दीन फॅमिली'चा धमाल ट्रेलर रिलीज

भारतीय कुटुंबांमधील अशांतता, भावना आणि अतूट बंधनांबद्दलच्या कथा नेहमीच प्रेक्षकांना मोहून टाकतात. दिग्दर्शिका अनुषा रिझवी पुन्हा एकदा तिच्या नवीन विनोदी-नाटक "द ग्रेट शमसुद्दीन फॅमिली" द्वारे या नात्यांमधील गुंतागुंत आणि उबदारपणा पडद्यावर आणत आहे. "पीपली लाईव्ह" सारखे चित्रपट देणारी अनुषा यावेळी एका आधुनिक भारतीय कुटुंबातील अशांतता हलक्याफुलक्या पण भावनिक पद्धतीने सादर करत आहे.ट्रेलरने आधीच चित्रपटासाठी खूप उत्साह निर्माण केला आहे. ही गोष्ट फक्त १२ तासांच्या कालावधीत एकाच कुटुंबात घडणाऱ्या सततच्या गोंधळ, संघर्ष आणि विनोदी परिस्थितींभोवती फिरते. ही रोलर-कोस्टर राईड प्रेक्षकांना कौटुंबिक संघर्ष, वैयक्तिक संघर्ष आणि नातेसंबंधांच्या गुंतागुंतीची खरी झलक दाखवेल."द ग्रेट शमसुद्दीन फॅमिलीमध्ये कृतिका कामरा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. ही कथा बानी नावाच्या एका मुलीभोवती फिरते, जी तिच्या स्वतःच्या निवडी आणि तिच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये अडकलेली असते. ट्रेलरमध्ये पूरब कोहली, श्रेया धनवंतरी, जुही छब्बर, शीबा चड्डा आणि डॉली अहलुवालिया यांची झलक दाखवण्यात आली आहे. पण त्यातील एक वेगळी व्यक्तिरेखा म्हणजे फरीदा जलाल, जी पडद्यावर पाहणे आनंददायी आहे. या चित्रपटात अभिनेत्री कृतिका कामरा ही कुटुंबातील मोठी मुलगी, एक नवोदित लेखिका बानी अहमदची भूमिका साकारते. बानीला १२ तासांत एक महत्त्वाचा प्रकल्प पूर्ण करायचा असतो, पण त्या दिवशी तिचे संपूर्ण घर युद्धभूमी बनते. कुटुंबातील प्रत्येक सदस्याला काही ना काही समस्या असते, जी बानीच्या कामात सतत अडथळा आणते.



# तृप्ती डिमरीची कथित बॉयफ्रेंडसह गोवा ट्रिप

तृप्ती डिमरी बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. तृप्तीने आजवर विविध भूमिका साकारल्या आहेत. परंतु, ती खऱ्या अर्थाने प्रसिद्धीझोतात आली ते 'ॲनिमल' चित्रपटामुळे. या चित्रपटानंतर अभिनेत्री अनेकांच्या चर्चेचा विषय ठरली होती. अशातच आता अभिनेत्री तिच्या खासगी आयुष्यामुळे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. तृप्ती तिच्या कामातून वेळ काढून अनेकदा वेगवेगळ्या ठिकाणी फिरायला जात असल्याचं तिच्या सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या फोटोंमधून पाहायला मिळतं. अशातच अभिनेत्रीने सोशल मीडियावर गोवा येथील तिचे काही फोटो व व्हिडीओ शेअर केले आहेत. अभिनेत्री तिच्या कामातून वेळ काढत सुट्टया एन्जॉय करत असल्याचं या फोटोंमधून पाहायला मिळत आहे.गोवा येथे तृप्ती एकटी गेली नसून तिच्याबोरबर तिचा कथित बॉयफ्रेंड सॅम मर्चंटही असल्याचं सोशल मीडियावरील फोटोंवरुन पाहायला मिळत आहे. तृप्तीने इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर केला या व्हिडीओवर तिने सॅमला टॅग केलं आहे. तर या दोघांनी एकच ठिकाणचे काही फोटो आणि व्हिडीओ त्यांच्या अकाउंटवरुन शेअर केल्या आहेत. तसंच एकमेकांच्या इन्स्टाग्राम स्टोरीही रिपोस्ट केल्या आहेत.तृप्ती गोव्यामधील विविध ठिकाणी फिरत असून ती तिथल्या विविध पदार्थांचा आस्वाद घेत आहे, हे खास क्षण तिने सोशल मीडियवर शेअर केले आहेत. यावेळी तिने पाणीपुरी, भेळपुरी यांसारख्या पदार्थांवरही ताव मारल्याचं या फोटोमधून पाहायला मिळत आहे. तृप्तीचा कथित बॉयफ्रेंड सॅम मर्चंटबद्दल बोलायचं झालं तर, तो एक मॉडल आहे. मॉडलिंग क्षेत्रात येण्यापूर्वी हॉटेल व्यावसायात सक्रिय होता. सॅम व तृप्ती गोवा येथे पहिल्यांदाच एकत्र फिरायला गेले नाहीयेत; तर यापूर्वीसुद्धा ते फिनलँड येथे एकत्र गेले होते. तर सॅम अनेकदा तृप्तीच्या कामांसाठी तिचं कौतुक करताना दिसतो. 'स्पिरीट' या चित्रपटात तिची वर्णी लागल्यानंतर त्याने सोशल मीडियामार्फत तिला शुभेच्छा दिल्या होत्या. दरम्यान, तृप्ती डिमरीबद्दल बोलायचं झालं तर, 'स्पिरीट' आणि 'धडक २' या चित्रपटांतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## पंड्याचे पुनरागमन निश्चित शुभमन गिलचे पुनरागमन होईल का?

# टी-20 मालिकेसाठी संघ कधी जाहीर!

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सध्या तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळली जात आहे. या मालिकेनंतर पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळवण्यात येणार आहे. दोन्ही संघांमधील पाच सामन्यांची ही टी-२० मालिका ९ डिसेंबरपासून खेळवली जाणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची अद्याप घोषणा करण्यात आलेली नाही. परंतु बीसीसीआय भारतीय संघाची घोषणा कधी करेल आणि कोणते खेळाडू संघात परतणार आहेत? याबद्दल महत्त्वाची माहिती आता समोर आली आहे.**

## 'या' स्टार खेळाडूचे परतणे शक्य




टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणेकडे सर्वांच्या नजरा लागून आहेत. एका वृत्तांनुसार, बीसीसीआय ३ डिसेंबर रोजी टीम इंडियाची घोषणा करण्याची शक्यता आहे. भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्ध शेवटची टी-२० मालिका खेळली असून या मालिकेत भारताने ३-१ असा विजय मिळवला होता. त्या मालिकेत अनेक तरुण खेळाडूंच्या शानदार प्रदर्शनाच्या जोरावर भारताने मालिका खिशात घातली. आता काही वरिष्ठ आणि नियमित खेळाडू दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी परतण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.२०२५ च्या आशिया कप दरम्यान दुखापतीमुळे हार्दिक पंड्या भारतीय संघाबाहेर आहे. तथापि बातमी समोर येत आहे की हार्दिकची तंदुरुस्तीमध्ये झपाट्याने सुधार झाला आहे. तसेच तो आता सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये खेळत देखील आहे. त्यामुळे आता निवड समिती त्याला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत संधी देण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्याच्या पुनरागमनामुळे फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही विभागात भारतीय संघाला अधिक बळकटी मिळेल.शुभमन गिलला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेदरम्यान मानेच्या दुखापतीमुळे संघाबाहेर झाला आहे. त्याला विश्रांती देण्यात आली होती. पहिल्या कसोटीनंतर त्याला संघाबाहेर ठेवण्यात आले होते. आता तो टी-२० मालिकेसाठी उपलब्ध असण्याची शक्यता आहे. गिल टी-२० स्वरूपात सातत्य आणि जलद धावगती दोन्ही प्राप्त करून देऊ शकतो. त्यामुळे संघात त्याची उपस्थिती संघाच्या टॉप ऑर्डरसाठी महत्त्वाची असणार आहे.टी-२० स्वरूपात भारतासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारा स्टार खेळाडू ऋतुराज गायकवाड बराच काळ उलटून गेला भारतीय संघाचा भाग नाही. त्याने २०२४ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध शेवटची टी-२० मालिका खेळली होती. देशांतर्गत क्रिकेट आणि आयपीएलमधील त्याची कामगिरी शानदार राहिली आहे. त्यामुळे, निवडकर्ते त्याला बॅकअप ओपनर आणि लवचिक फलंदाज म्हणून पुन्हा संधी देण्याचा विचार करण्याची शक्यता आहे.भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सध्या तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळली जात आहे. या मालिकेनंतर पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळवण्यात येणार आहे. दोन्ही संघांमधील पाच सामन्यांची ही टी-२० मालिका ९ डिसेंबरपासून खेळवली जाणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची अद्याप घोषणा करण्यात आलेली नाही. परंतु बीसीसीआय भारतीय संघाची घोषणा कधी करेल आणि कोणते खेळाडू संघात परतणार आहेत? याबद्दल महत्त्वाची माहिती आता समोर आली आहे. टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणेकडे सर्वांच्या नजरा लागून आहेत. एका वृत्तांनुसार, बीसीसीआय ३ डिसेंबर रोजी टीम इंडियाची घोषणा करण्याची शक्यता आहे. भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्ध शेवटची टी-२० मालिका खेळली असून या मालिकेत भारताने ३-१ असा विजय मिळवला होता. प्रदर्शनाच्या जोरावर भारताने मालिका खिशात घातली. आता काही वरिष्ठ आणि नियमित खेळाडू दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी परतण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## कोणते खेळाडू परतणार?

२०२५ च्या आशिया कप दरम्यान दुखापतीमुळे हार्दिक पंड्या भारतीय संघाबाहेर आहे. तथापि बातमी समोर येत आहे की हार्दिकची तंदुरुस्तीमध्ये झपाट्याने सुधार झाला आहे. तसेच तो आता सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये खेळत देखील आहे. त्यामुळे आता निवड समिती त्याला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत संधी देण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्याच्या पुनरागमनामुळे फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही विभागात भारतीय संघाला अधिक बळकटी मिळेल.

# खापतीनंतर हार्दिक पांड्याची डरकाळी!

## बॅटने उडवून दिली खळबळ; संघाला मिळवून दिला एकहाती विजय

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रिकेटपासून जवळजवळ दोन महिने दूर असलेला भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या आता पुन्हा मैदानात परतला आहे. हार्दिक पंड्या मैदानात परतला आणि त्याने टी-२० फॉरमॅटमधील तो सर्वात धोकादायक अष्टपैलू खेळाडूंपैकी एक खेळाडू म्हणून का ओळखले जाते, ही पुन्हा एकदा आपल्या खेळीने सिद्ध केले आहे.**



पंजाबविरुद्धच्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी सामन्यात, हार्दिक पंड्याच्या स्फोटक फलंदाजीमुळे बडोद्याने एक संस्मरणीय विजय आपल्या नावावर केला आहे. चौथ्या क्रमांकावर खेळताना, त्याने सुरुवातीपासूनच आक्रमक दृष्टिकोन स्वीकारला आणि संघाला कठीण लक्ष्य गाठून देण्यात मोठे योगदान दिले आहे.पंजाब संघाने दिलेल्या २२३ धावांच्या डोंगराएवढ्या लक्ष्याचा सामना करताना, बडोद्याने दमदार सुरुवात केली. सलामीवीर विष्णू सोलंकी आणि शाश्वत रावत यांनी आक्रमक फलंदाजी केली आणि पहिल्या पाच षटकांत धावसंख्या ६० च्या पुढे नेऊन ठेवली. शाश्वतने ३१ चेंडूत ४३ धावा केल्या, तर विष्णूही २१ चेंडूत ४३ धावा करत माघारी गेला. दोन्ही सलामीवीरांच्या बाद झाल्यानंतर, असे वाटू लागले होते की, धावगतीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. परंतु नंतर हार्दिक आणि शिवालिक शर्माने डाव सांभाळला. त्यांनी तिसऱ्या विकेटसाठी शानदार शतकी भागीदारी रचत पंजाबच्या गोलंदाजांना झुलवले.शिवालिक शर्मा ३१ चेंडूत ४७ धावा करून रिटायर्ड हर्ट झाला, परंतु दुसऱ्या टोकाला हार्दिक पंड्या चांगल्याच त्याने ४२ चेंडूंच्या खेळीत ७ चौकार आणि ४ उत्तुंग षटकार मारत ७७ धावा फटकावल्या.

## पंड्या गोलंदाजीत अपयशी

तो सेट झाल्यावर त्याने पंजाबच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. शेवटच्या षटकांमध्ये त्याच्या खेळीमुळे बडोद्याला सामना त्यांच्या बाजूने वळवण्याची उत्तम संधी मिळाली आणि परिणामी संघाने ५ चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला.हार्दिक पंड्याची फलंदाजीमध्ये दम दाखवला असला तरी त्याची गोलंदाजी मात्र अपेक्षेनुसार राहिली नाही. त्याने ४ षटकांत ५२ धावा दिल्या.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। बुधवार।
। दि. 3 डिसेंबर 2025।

## केंद्र सरकारच्या ‘नवीन श्रम संहिता’

# व्यावसायिकांनी आत्मसात करावी - ॲड. अद्वैत पटवर्धन

### शिक्षण विश्व: एसबीपीआयएम मध्ये ‘नवीन श्रम संहिता’ विषयावर कार्यशाळा संपन्न

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**केंद्र सरकारने नुकतेच जुने कामगार कायदे रद्द करून नवीन चार श्रम संहितांना मंजुरी दिली आहे. याची अंमलबजावणी करताना नियोक्ता कर्मचारी संबंध, संस्थात्मक अनुपालन आणि कार्य स्थळातील संस्कृती यावर मोठा परिणाम होणार आहे. याच्या पार्श्वभूमीवर एचआर, व्यावसायिकांनी सखोल ज्ञान मिळवून ‘नवीन श्रम संहिता’ आत्मसात करावी असे मत ॲड. अद्वैत पटवर्धन यांनी व्यक्त केले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) आकुर्डी येथील एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनल मॅनेजमेंट (एनआयपीएम) पुणे चैप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने एसबीपीआयएम पुणे येथे ‘नवीन श्रम संहिता’ विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी ॲड. श्रीकांत मालेगावकर, ॲड. पंकज मोहोलकर, ॲड. जयंत शालिग्राम, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, एनआयपीएम चे पुणे चैप्टर अध्यक्ष डॉ. कल्याण पवार, सचिव डॉ. अजित ठाकूर, डॉ. सतीश पवार, वहिदा पठाण, एसबीपीआयएमच्या संचालक डॉ. कीर्ती धारवाडकर आदी उपस्थित होते.

या कार्यशाळेत पुणे, नाशिक, सातारा, कोल्हापूर व उर्वरित महाराष्ट्र मधून १७५ पेक्षा जास्त एचआर व्यावसायिकांनी सहभाग घेतला. वेतन संहिता, औद्योगिक संबंध संहिता, सामाजिक सुरक्षा संहिता आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामगार परिस्थिती संहिता या चार श्रमसंहिता बाबत तज्ञांनी विचार व्यक्त केले.

नवीन श्रमसंहिता आजच्या एचआर आणि शैक्षणिक क्षेत्राला उपयुक्त ठरेल, त्याचे कायदेशीर आणि व्यावहारिक महत्व समजून घेतले पाहिजे असे ॲड. श्रीकांत मालेगावकर यांनी सांगितले.

पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उद्योग व शैक्षणिक सहयोग बळकट करण्याच्या दृष्टीने आपले विचार मांडले.

उद्योगांच्या सहभागामुळे कार्यक्षमता असणारे, उद्योगसिद्ध विद्यार्थी तयार करण्यास मदत होते. पीसीईटीमध्ये बोर्ड ऑफ स्टडीज मधील सहभाग, इंटर्नशिप कार्यक्रम आणि नव्या उद्योग अपेक्षांसह प्लेसमेंट उपक्रमांची माहिती दिली. अशा उपक्रमांमुळे उद्योग, एचआर आणि शैक्षणिक क्षेत्रात गरजेनुसार सक्षम वातावरण निर्माण होण्यास मदत होते असा विश्वास डॉ. देसाई यांनी यावेळी व्यक्त केला.

डॉ. कल्याण पवार म्हणाले की, भारत सरकारने जुन्या कामगार कायद्याच्या जागी नवीन चार कोड्स नुकतेच भारतभर लागू केले आहेत. त्याची अंमलबजावणी देशातील सर्व उद्योग, व्यासायिकांनी करायची आहे.

स्वागत डॉ. किर्ती धारवाडकर आणि सूत्रसंचालन ॲड. प्रशांत क्षीरसागर यांनी तर आभार बाळासाहेब सोनवणे यांनी मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

---

## बॉक्सिंग स्पर्धेत धीरा माने सुवर्णपदकाची मानकरी

### शिक्षण विश्व: एम एम विद्यालयच्या लौकिकात मानाचा तुरा!

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड संघातील खेळाडू धीरा माने हिने पुण्यातील जनरल अरुण कुमार वैद्य स्टेडियम येथे पार पडलेल्या विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत 66 किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या आधारावर आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अलिबाग येथे तिची निवड झाली आहे.**




धीरा माने सध्या थेरगाव येथे घेतले असून सध्या एम एम विद्यालय काळेवाडी येथे ती बारावी वर्गात शिक्षण घेत आहे. शिक्षण आणि खेळ यांचा समतोल राखत सातत्याने मेहनत घेतल्याने तिने हा यशाचा टप्पा गाठला आहे. सलग तीन वेळा राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड होण्याचा मान तिला मिळाला आहे.सध्या ती मार्गदर्शक यशवंत माने आणि संदीप माने यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे. स्पर्धेदरम्यान क्रीडा शिक्षक हराळे तसेच मार्गदर्शक वचकल आणि गिरीजा यांचे तिला मोलाचे मार्गदर्शन लाभले.

#### कौतुकाचा वर्षाव !

एम एम विद्यालयाचे मुख्याध्यापक तसेच क्रीडा शिक्षक हराळे यांनी तिच्या कामगिरीचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. धीरा माने हिच्या मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील ल्हासुर्णे गावातील शैक्षणिक राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनीही तिच्या कामगिरीचा गौरव केला आहे.

### शिक्षण विश्व: पीसीईटी शैक्षणिक संकुलात नवव्या 'आयसीसीयुबीईए

# विद्यार्थ्यांना मिळाले स्वच्छतेचे धडे!

## शिक्षण विश्व: प्रियदर्शनी स्कूलतर्फे मोशी येथे स्वच्छता जनजागृती मोहीम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विशेष स्वच्छता जनजागृती मोहीम राबविण्यात आली. लहान वयातच स्वच्छतेचे संस्कार रुजावेत, यासाठी विद्यार्थ्यांशी संवाद साधत वैयक्तिक स्वच्छता, कचरा वर्गीकरण, प्लास्टिकचा कमीतकमी वापर आणि शाळा तसेच परिसर नेहमी स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व सविस्तर समजावून सांगितले.**




या मार्गदर्शन सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी स्वच्छतेविषयी अनेक प्रश्न विचारत उत्साहाने सहभाग नोंदवला. पालिकेच्या यांच्यावतीने 'ओला व सुका कचरा वेगळा करा', 'स्वच्छता राखा - रोगांपासून दूर राहा' आणि 'स्वच्छ परिसर म्हणजे निरोगी शहर' हे संदेश विविध उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवले. या उपक्रमामुळे मुलांमध्ये स्वच्छतेबद्दल जागरूकता वाढताना दिसली.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले, "विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची शपथ घेणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. मुलांना दिलेला स्वच्छतेचा संदेश त्यांच्या दैनंदिन सवयींमध्ये सकारात्मक बदल घडवेल याची आम्हाला खात्री आहे. स्वच्छ विद्यार्थी म्हणजे स्वच्छ कुटुंब आणि अखेरीस स्वच्छ शहर हेच या मोहिमेचे खरे यश हे."

**विद्यार्थ्यांना जबाबदारीची जाणीव**

पीसीएमसीच्या या उपक्रमामुळे शाळेतील वातावरणात उत्साह निर्माण झाला असून विद्यार्थ्यांना शाळेसोबतच आपल्या घरगुती आणि सामाजिक परिसरातही स्वच्छता राखण्याची प्रेरणा मिळाली. शहर स्वच्छ राहण्यासाठी प्रत्येक नागरिकाची जबाबदारी महत्त्वाची असल्याचा संदेश ह्या मोहिमेद्वारे प्रभावीरीत्या पोहोचला.

---

# प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचना तत्काळ निकाली काढा

## आयुक्त श्रावण हर्डीकर : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा बैठक

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर आलेल्या हरकती व सूचना तात्काळ निकाली काढा, असे निर्देश आयुक्त श्रावण हार्डिकर यांनी दिले आहेत.**



> पिंपरी चिंचवड महापालिका नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचना तांत्रिक अचूकतेसह निकाली काढण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या निवडणूक विभागाकडून कार्यवाही गतीमान केली आहे. नागरिकांनी केलेल्या प्रत्येक अर्जावर संबंधित अधिकारी प्राधान्याने कार्यवाही करत आहेत.
>
> **-विजयकुमार खोराटे,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

महापालिकेतील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात आज प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचना यासह मतदान केंद्र निश्चिती, दुबार मतदार यादी आदी कामकाजाबाबत आढावा बैठक आयुक्त हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी ते बोलत होते.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, नगर सचिव मुकेश कोळप, स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, सहाय्यक संचालक नगररचना प्रशांत शिंपी, महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, डॉ. प्रदीप ठेंगल, सिताराम बहुरे, संदीप खोत, पंकज पाटील, व्यंकटेश दुर्वास, सहाय्यक आयुक्त अतुल पाटील, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, तानाजी नरळे, पूजा दूधनाळे, अश्विनी गायकवाड, राजाराम सरगर, प्रशासन अधिकारी सरिता मारणे, संगीता बांगर, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, कार्यालय अधीक्षक रमेश यादव तसेच निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

आयुक्त हर्डीकर म्हणाले, नागरिकांचे नाव मतदार यादीत योग्यरित्या समाविष्ट व्हावे, दुबार नोंदणी टाळली जावी आणि अधिकाधिक पात्र मतदारांचा सहभाग सुनिश्चित व्हावा, यासाठी निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी वर्गाने सूक्ष्म नियोजन करून प्रारूप मतदार यादीवर आलेल्या प्रत्येक हरकती व सूचनांची छाननी करावी. हरकती व सूचनांबाबत योग्य ती कार्यवाही करून त्या निकाली काढाव्यात. नियोजित महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान केंद्रांची निश्चिती, नव्या तात्पुरत्या मतदान केंद्रांची आवश्यकता, सुलभ सुविधांची उपलब्धता, तसेच क्षेत्रनिहाय मतदार संख्येचे विश्लेषण याबाबतही अधिकाऱ्यांनी सजग राहून नियोजनबद्ध पद्धतीने तयारी करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

निवडणुकीची तयारी म्हणून शहरातील मतदान केंद्रांची स्थळ निश्चिती, निवडणूक कक्ष अधिकाऱ्यांची नेमणुका, मतदान केंद्रांची सुविधा, दिव्यांगांसाठी सोयी, मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, ईव्हीएमची सुरक्षितता, मतदार यादी अद्ययावत करणे आणि प्रभागांतील आवश्यक पायाभूत दुरुस्ती, प्रारूप मतदार यादी, मतदानासाठी नागरिकांमध्ये जनजागृती वाढवण्याचे आणि तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करण्याचे निर्देश देखील आयुक्त हर्डीकर यांनी दिले.




Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046